# कार्यावली

**सोमवार, दिनांक १२ जुलै, २०१० रोजी दुपारी १.०० वाजता मुंबई येथील विधान भवनात सुरु होणाऱ्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०१० च्या द्वितीय अधिवेशनाची कार्यावली.**

**एक** : नवनिर्वाचित सदस्यांचा शपथविधी

**दोन** : मंत्र्यांचा परिचय

**तीन** : सभापतींनी, सभापती तालिकेवर सदस्य नामनिर्देशित करणे.

**चार** : प्रश्नोत्तरे.

**पाच** : अध्यादेश सभागृहासमोर ठेवणे.

**सहा** : सन २०१०-२०११ च्या पुरवणी मागण्या सादर करणे व त्यावर चर्चा करणे.

**सात** : लोकलेखा समितीचा अहवाल सादर करणे.

**आठ** : अंदाज समितीचा अहवाल सादर करणे.

**नऊ** : पंचायती राज समितीचा अहवाल सादर करणे.

**दहा** : रोजगार हमी योजना समितीचा अहवाल सादर करणे.

**अकरा** : अनुसूचित जमाती कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**बारा** : विधानपरिषद नियम समितीचा अहवाल तयार करणे.

**तेरा** : महिलांचे हक्क व कल्याण समितीचा अहवाल सादर करणे.

**चौदा** : मंत्र्यांनी कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.

**पंधरा** : **शासकीय विधेयके.**
विधानसभेने संमत केल्याप्रमाणे- विचार पुढे सुरु- खंडशः विचार व संमत करणे.

अ) सन २००९ चे वि.स.वि. क्रमांक ४१ - मुंबई महानगरपालिका, मुंबई प्रांतिक महानगरपालिका, नागपूर शहर महानगरपालिका, मुंबई पोलीस आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २००९.

ब) सन २०१० चे वि.स.वि. क्रमांक १ - नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१०.

**सोळा** : शोक प्रस्ताव.

**सतरा** : इतर शासकीय कामकाज ज्याची सूचना नंतर देण्यात येईल.

**अठरा** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर अल्पकालीन चर्चा- म.वि.प.नियम

९७ अन्वये.

**एकोणीस** : तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे मंत्र्यांचे लक्ष वेधणे- म.वि.प.नियम १०१ अन्वये.

**वीस** : अनियत-दिन-प्रस्ताव (म.वि.प. नियम २६२ अन्वये) सूची स्वतंत्रपणे वितरित करण्यात येईल.

**एकवीस** : अशासकीय विधेयके :- विचारार्थ :-

१) सन २००९ चे वि.प.वि.क्रमांक २ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक ,२००९. श्रीमती निलम गोऱ्हे, वि.प.स. यांचे

२) सन २००९ चे वि.प.वि.क्रमांक ४- महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक, २००९. श्री. रामनाथ मोते, वि.प.स. यांचे

३) सन २०१० चे वि.प.वि.क्रमांक १- मुंबई प्राथमिक शिक्षण आणि महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियमन (सुधारणा) विधेयक २०१०. श्री. कपिल पाटील, वि.प.स. यांचे

४) सन २०१० चे वि.प.वि.क्रमांक २ - महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) इलेक्ट्रॉनिक कचरा (नियमन, नियंत्रण आणि विल्हेवाट)विधेयक, २०१०. डॉ.दिपक सावंत, वि.प.स.यांचे

**बावीस** : अशासकीय ठराव (म.वि.प. नियम १०२ अन्वये)-

**श्री.जयंत पाटील यांचा ठराव क्रमांक १,२,३,४,५**

(१) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२) '' कोकणातील विशेषत: रायगड, रत्नागिरी, सिंधुदूर्ग व ठाणे या चार जिल्हयांसाठी एक स्वतंत्र मत्स्य विद्यापीठ स्थापन करुन त्यात मत्स्यव्यवसायासंबंधी विविध अभ्यासक्रम अंतर्भूत करावेत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३) '' राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य व्हावीत याकरिता सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, नाले व मोऱ्या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना अंमलात आणावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४) '' राज्यात किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व लक्षात घेता किल्ल्यांचे परिसर पर्यटन केंद्र म्हणून विकसित करण्याबाबत तसेच त्या ठिकाणी मार्गदर्शक नेमण्याबाबत व पर्यटकांसाठी अन्य आवश्यक त्या

सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन या सर्व किल्ल्यांचे ऐतिहासिक महत्व कायम राखण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने खास उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५) '' राज्यात कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस ढासळत चाललेली परिस्थिती, तसेच पोलिसांना गुन्हा शोधून काढण्यात येत असलेले अपयश, वाढत्या गुन्हेगारीमुळे जनतेत निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना विचारात घेता, या संदर्भात अभ्यास करुन निश्चित उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सदनातील सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**डॉ.निलम गोऱ्हे यांचा ठराव क्रमांक ६, ८**

(६) '' मुंबई शहर ही देशाची आर्थिक राजधानी असून ते जागतिक किर्तीचे व्यापारी केंद्र होण्यासाठी लागणाऱ्या मूलभूत (इन्फ्रास्टक्चर) सुविधा पुरविण्यासाठी लागणारा कोट्यावधी रुपयांचा निधी, हा निधी उपलब्ध करुन देण्याची मुंबई महानगरपालिकेची आर्थिक क्षमता नसल्याने मुंबई शहराचा सर्वांगिण विकास करण्यासाठी व मुंबईचे शांघाय करण्यासाठी लागणारा कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याची पंतप्रधानांनी व मुख्यमंत्र्यांनीही वेळोवेळी केलेली घोषणा मुंबई शहरापासून केंद्र व राज्य शासनाला मिळत असलेला कोट्यावधी रुपयांच्या निधीतून मुंबई शहराच्या सर्वांगीण विकास करण्यासाठी निधी उपलब्ध करुन व विकासाच्या कामांची कालमर्यादा (टाईम बॉन्ड प्रोग्राम) निश्चित करुन केंद्र व राज्य शासनाला अभिप्रेत असलेला मुंबई शहराला शांघाय शहराच्या धर्तीवर विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने योग्य ती पावले उचलावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(८) '' राज्यात रस्त्यावरील वाहनांच्या संख्येत झालेली प्रचंड वाढ, त्यामानाने रस्ते अरुंद व तसेच वाहतुक सिग्नल योग्य नसल्याने व राज्यातील द्रुतगती मार्गाची योग्य ती देखभाल होत नसल्याने राज्यात वाहनांच्या अपघातात झालेली लक्षणीय वाढ, रस्त्यावरील अपघातामुळे होणारी जिवित व वित्तहानी लक्षात घेता राज्यातील रस्त्यांवरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.सुभाष चव्हाण यांचा ठराव क्रमांक १३,१४,१५,१६,१७**

(१३) '' कोकणातील भुभागापैकी सुमारे ५३.४५ टक्के पडित असलेल्या जमिनीत आंबा, काजू, सुपारी, कोकम, नारळ इ.फळांची लागवड आणि साग, शिसम, आईन, किंजळ, खैर इ.वृक्षांची वनराईची पध्दतशीर लागवड करण्याच्या दृष्टीने धडक कार्यक्रम हाती घेऊन या कार्यक्रमासाठी आर्थिक तरतूद व अन्य उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१४) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१५) '' पूर, गारपीट या सारख्या नैसर्गिक आपत्तीत सापडलेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून देण्यात येणारी रुपये १००० ची आर्थिक मदत अतिशय अपुरी असल्यामुळे व ती देताना सुध्दा २ हेक्टर पर्यंतची कमाल मर्यादा असल्यामुळे नैसर्गिक आपत्तीत सापडणाऱ्या शेतकऱ्यांच्या डोक्यावर कायमची असणारी असुरक्षितता दूर करण्यासाठी शासनाने आर्थिक मदतीची मर्यादा रुपये २००० पर्यंत वाढवावी व त्यासाठी

ठरविण्यात आलेली २ हेक्टरची कमाल मर्यादा हटविण्यात यावी अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

(१६) '' राज्यातील सर्व गावे बारमाही वाहतूकीस योग्य होण्यासाठी सर्व ग्रामीण भागातील रस्त्यांची पाहणी करुन आवश्यक असेल तेथे नद्या, नाले व मो-या यांचेवर पूल बांधण्याची धडक योजना अंमलात आणावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''
(१७) '' राज्यातील ग्रामीण भागातील सर्व खेडी नजिकच्या महामार्गांना डांबरी रस्त्याने जोडण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती अलका देसाई यांचा ठराव क्रमांक १८,१९,२०,२१,२२**

(१८) '' वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(१९) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२०) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तीर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेवून शासनाने योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे.''

(२१) '' राज्यात विना अनुदानित अभियांत्रिकी, वैद्यकीय महाविद्यालयांना फी वाढीचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने विनाअनुदानित अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांच्या संचालकांनी फी मध्ये केलेली असमर्थनीय वाढ, सदर फी वाढीमुळे अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयांमधून शिक्षण घेणे गरीब, हुशार व होतकरु विद्यार्थ्यांच्या आर्थिक कुवतीबाहेरचे होणे, परिणामी त्यांना अशा महत्वाच्या शिक्षणाला मुकावे लागणे, ही वस्तुस्थिती लक्षात घेता अभियांत्रिकी व वैद्यकीय महाविद्यालयामधील फी भरण्यासाठी अशा हुशार व गुणवान विद्यार्थ्यांना त्यांचे शिक्षण पूर्ण होईपर्यंत शासनाने आर्थिक सहाय्य कर्जरुपाने उपलब्ध करुन द्यावे व शिक्षण पूर्ण झाल्यावर सदरहू कर्ज हप्त्याहप्त्याने वसूल करण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२२) '' राज्यात कायदा व सुव्यवस्थेची दिवसेंदिवस ढासळत चाललेली परिस्थिती, तसेच पोलिसांना गुन्हा शोधून काढण्यात येत असलेले अपयश, वाढत्या गुन्हेगारीमुळे जनतेत निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना विचारात घेता, या संदर्भात अभ्यास करुन निश्चित उपाययोजना सुचविण्यासाठी

विधानमंडळाच्या दोन्ही सदनातील सदस्यांची एक उच्चस्तरीय समिती स्थापन करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**प्रा.सुरेश नवले यांचा ठराव क्रमांक २४,२५,२६,२७,२८**

(२४) '' राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा राज्यस्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परिक्षा, लोकसेवा आयोग व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२५) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्क विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२६) '' राज्यातील विनाअनुदान तत्वावर मान्यता देऊन सुरु करण्यात आलेल्या माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना अनुदानाअभावी प्रयोगशाळा, ग्रंथालये व इतर शैक्षणिक सोयी सुविधा उपलब्ध होऊ शकत नाहीत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या प्रगतीवर होणारा विपरीत परिणाम विचारात घेता विना अनुदान तत्वावर मान्यता दिलेल्या राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२७) '' राज्यातील बहुसंख्य गावात विशेषत: उन्हाळयात पिण्याच्या पाण्याची भासत असलेली भीषण टंचाई, तसेच विविध कारणांमुळे बंद पडलेल्या अनेक पाणीपुरवठा योजना व त्यांच्या देखभालीत होणारी कुचराई, परिणामी, ग्रामीण जनतेचे पिण्याच्या पाण्यासाठी होणारे हाल विचारात घेता पाणी टंचाई कायमस्वरुपी दूर करण्यासाठी शासनाने एक खास कार्यक्रम आखावा व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(२८) '' राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा लक्षात घेता या प्रकरणी आमुलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.राजन तेली यांचा ठराव क्रमांक २९,३०,३१,३२**

(२९) '' "कोकणातील ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी तसेच मुंबईच्या वाढत्या लोकसंख्येच्या अनुषंगाने त्याचप्रमाणे शहरीकरणाच्या विकासाच्या दृष्टीने पाण्याची निर्माण होत असलेली समस्या सोडविण्यासाठी कोयना धरणाचे विजनिर्मितीनंतर वशिष्ठ नदीच्या (ता. चिपळूण, जि. रत्नागिरी) पात्रातून वाया जाणारे पाणी कोकणातील जिल्ह्यांना तसेच मुंबईसह ठाणे व नवी मुंबई या महानगरपालिकांच्या पाण्याची समस्या/दुष्काळ दूर करण्याच्या दृष्टीने शासनाने चिपळूण तालुक्यातील वशिष्ठ नदीतील पाणी परशुराम घाटाच्या पायथ्यापासून उचलून (लिफ्टिंग) निसर्गाच्या गुरुत्वाकर्षणाच्या शक्तीने पूर्ण कोकण विभागाला पुरविण्याकरिता शासनाने एक खास कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(३०) '' राष्ट्रीय स्तरावरील भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा राज्यस्तरावरील वैद्यकीय महाविद्यालयातील प्रवेश परिक्षा, लोकसेवा आयोग व तत्सम स्पर्धात्मक परिक्षांमध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यातील विद्यार्थ्यांचे अत्यल्प प्रमाण लक्षात घेता हे प्रमाण वाढविण्याच्या दृष्टीने उमेदवारांची योग्य प्रकारे व अद्ययावत पध्दतीने पूर्वतयारी करुन घेण्यासाठी राज्यातील सर्व माध्यमिक शाळांना चालू शैक्षणिक वर्षापासून १०० टक्के अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३१) '' राज्यातील प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचा दिवसेंदिवस खालावत चाललेला दर्जा लक्षात घेता या प्रकरणी आमुलाग्र सुधारणा करण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३२) '' राज्यात विशेषत: ठाणे, रत्नागिरी, रायगड व सिंधुदूर्ग या जिल्हयांच्या किनारपट्टीवरील अनेक गावांच्या संरक्षणासाठी हजारो किलोमीटर लांबीचे बांधण्यात आलेले धूप प्रतिबंधक बंधारे दरवर्षी अनेक वेळा फुटल्यामुळे समुद्राचे खारे पाणी 'शेतजमिनीत शिरुन मालमत्तेचे, झाडांचे व शेतीचे सतत होणारे नुकसान, दिवसेदिवस समुद्राच्या आक्रमणांची वाढती तीव्रता व परिणामी लोकांच्या मालमत्तेचे मोठया प्रमाणात होत असलेले नुकसान लक्षात घेता समुद्राच्या वाढत्या अतिक्रमणाचा गंभीर स्वरुपाचा धोका निर्माण होऊ नये यासाठी शासनाने या चारही जिल्हयांतील गावांच्या संरक्षणासाठी नियोजनबध्द व कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**श्री.संजय केळकर यांचा ठराव क्रमांक ३३,३५,४५**

(३३) '' राज्यातील वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शौचालयांची अपुरी पडत असलेली संख्या, त्यामुळे गावचे रस्ते, क्रिडांगणे, मोकळ्या जागा, पाणवठे यांचा यासाठी होत असलेला सर्रास वापर, परिणामी सर्वत्र अस्वच्छता पसरुन जनतेच्या आरोग्यास निर्माण झालेला गंभीर धोका, तसेच महिलांची होणारी कुचंबणा लक्षात घेता घर तेथे शौचालय हा कार्यक्रम शासनाने युध्द पातळीवर राबवावा, याकरिता आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३५) '' राज्यात ग्रामीण भागात ग्रामपचांयातीना देखभालीसाठी हस्तांतरीत करण्यात आलेल्या नळपाणी पुरवठा योजना, निधी तसेच योग्य व्यवस्थानाअभावी बंद अवस्थेत असण्याचे वाढते प्रमाण विचारात घेता राज्यातील पाणी टंचाईचे नियंत्रण करण्याच्या दृष्टीने सदर नळपाणी योजना शासनाने स्वतंत्र महामंडळ स्थापन करुन त्याकडे सोपवाव्यात अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४५) '' राज्यातील महिला व बालविकास विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या शेकडो वसतीगृहात निवास करुन अध्ययन करीत असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना दर्जात्मक शिक्षण, सकस आहार व आरोग्य विषयक सुविधा मिळत नसल्यामुळे त्यांचा शारिरिक व बौध्दिक विकास खुंटत असल्याने हया विद्यार्थ्यांना आवश्यक त्या परिपूर्ण सुविधा मिळण्यासाठी शासनाने कालबध्द कार्यक्रम आखावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.रामनाथ मोते यांचा ठराव क्रमांक ३७,३८,३९**

(३७) '' राज्यातील सर्व न्यायालयांचे कामकाज १०० टक्के मराठी भाषेतून होण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.''

(३८) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्क विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील

कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(३९) '' राज्यातील शिक्षण क्षेत्रात वाढत चाललेल्या भ्रष्टाचाराला व गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी शासनाने त्वरीत उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.केशवराव मानकर यांचा ठराव क्रमांक ४१,४२,४३,४४**

(४१) '' राज्यातील ग्रामीण भागात महिलांकरिता स्वच्छता गृहाची सोय होण्याच्या दृष्टीने प्रत्येक गावात महिलांसाठी किमान प्रत्येक गावात एक स्वतंत्र सुलभ शौचालय बांधण्यात यावीत, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४२) '' राज्यातील सहकार क्षेत्रातील साखर कारखाने, सूतगिरण्या, मध्यवर्ती बँका, खरेदी विक्री संघ, अॅपेक्स मार्केटिंग सोसायटया व शिखर बँका इ. संस्थांत राज्य शासनाने केलेली कोटयावधी रुपयांची गुंतवणूक लक्षात घेता उपरोक्त संस्थांच्या प्रशासकीय व आर्थिक कारभारावर योग्य प्रकारचे नियंत्रण ठेवण्यासाठी "लोकलेखा" समितीच्या धर्तीवर दोन्ही सभागृहाची एक संयुक्त समिती स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४३) '' राज्यातील सर्व शेतकऱ्यांना शेती व्यवसायासाठी लागणारी कर्जे ४ टक्के व्याजाच्या दराने पुरविण्याच्या दृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४४) '' राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत, जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.चंद्रकांत पाटील यांचा ठराव क्रमांक ४६,४७,४८,४९,५०**

(४६) '' वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, तसेच अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४७) '' राज्यातील धार्मिक स्थळांच्या व तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी भाविकांची होणारी अफाट गर्दी, परंतु धार्मिक स्थळी व तीर्थक्षेत्राकडे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भविकांना स्थानिक प्रशासनाकडून योग्य त्या सर्वसामान्य प्राथमिक सोयी सुविधाही उपलब्ध करुन दिल्या जात नसणे, परिणामी दर्शनाच्या वेळी चेंगराचेंगरीत शेकडो भाविकांना मृत्यू येणे, तसेच अनेक जण गंभीर जखमी होणे, त्यामुळे राज्यातील धार्मिक स्थळांच्या, तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी शासनाने योग्य सुविधांचे नियोजन करण्याची नितांत आवश्यकता विचारात घेऊन शासनाने योजना आखाव्यात व त्यांची अंमलबजावणी करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनाला करीत आहे ''

(४८) '' राज्यातील दूरदर्शन तसेच केबल नेटवर्कद्वारा प्रसारित होणाऱ्या विविध चॅनेलद्वारा अश्लील व हिंसाचारी चित्रपट, जाहिराती व विविध विषयांवरील मालिका सर्रासपणे प्रसारित केल्या जातात, परिणामी तरुणपिढीवर व बालमनावर त्यांचे होणारे दुष्परिणाम व वाढते लैंगिक गुन्हे लक्षात घेता या सर्व वाहिन्यांवरील अश्लील कार्यक्रमांवर बंदी घालावी यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे तात्काळ पाठपुरावा करावा, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(४९) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५०) '' राज्यातील जीवनावश्यक वस्तुंच्या बेसुमार वाढत असलेल्या किंमती, त्यावर नियंत्रण ठेवण्यात शासनाला आलेले अपयश, ऐन सणासुदीच्या वेळी बाजारात जीवनावश्यक वस्तुंचा कृत्रिम तुटवडा निर्माण करुन त्या वस्तुंची बेसुमार भाववाढ करण्याची व्यापारी वर्गात निर्माण झालेली प्रवृत्ती, सरकारमान्य स्वस्त धान्य दुकानात जीवनावश्यक वस्तुंचा निर्माण झालेला तुटवडा, त्यामुळे जनतेवर पडत असलेला आर्थिक ताण, या सर्व गोष्टींचा सर्वकष विचार करुन जीवनावश्यक वस्तुंचे योग्य व स्वस्त दराने वितरण करण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था अधिक बळकट करुन स्थिर भाव योजना आखावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.विक्रम काळे यांचा ठराव क्रमांक ५१,५४,५५**

(५१) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५४) '' महाराष्ट्र राज्य हे शेती उद्योगात अग्रेसर असल्यामुळे शेतकऱ्यांना शेतीमाल उत्पादन करण्यासाठी सतत वाढत असलेला उत्पादन खर्च लक्षात घेता शेतकऱ्यांना शेती उत्पादन करण्यासाठी अल्पदरात कर्ज पुरवठा करण्यासंदर्भात उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५५) '' राज्यातील सर्व माध्यमाच्या (इंग्रजी वगळून) प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधून उच्च प्रतिचे व गुणवत्तेचे शिक्षण विद्यार्थ्यांना मिळावे यासाठी त्या विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळांना अनुदान देण्याचे धोरण शासनाने स्विकारावे, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

**श्री.रामदास कदम यांचा ठराव क्रमांक ५६,५८,५९**

(५६) '' मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या अकार्यक्षमतेमुळे जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची वेळीच दुरुस्ती होत नसल्याने ऐन पावसाळयात इमारती कोसळून जिवित व वित्त हानी होण्याचे वाढत असलेले प्रमाण, जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची योग्यरित्या पाहणी न करणे, तसेच इमारतींच्या पुनर्रचनेची खोळंबलेली अनेक कामे, त्यातून मोठया प्रमाणात होत असलेला भ्रष्टाचार, त्यामुळे रहिवाशांत पसरलेला तीव्र असंतोष, या संदर्भात साकल्याने विचार करुन त्यावर परिणामकारक उपाययोजना सुचविण्यासाठी विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहातील सदस्यांची एक संयुक्त समिती नेमण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५८) '' कोकणातील विशेषत: रत्नागिरी प सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वरकस जमिनी पाण्याखाली आणण्यासाठी कोयना धरणाचे पाणी व या दोन्ही जिल्ह्यात सर्वात जास्त पाऊस पडतो, सदर पावसाचे

पाणी अडवून ते कोकणातील वरकस जमिनीला पुरविण्याचे दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखून त्याची त्वरेने युध्दपातळीवर अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(५९) '' राज्यात पिण्याच्या पाण्याची निर्माण झालेली व बिकट होत चाललेली समस्या लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याचा प्रश्न प्रभावीरित्या सोडविण्यासाठी धरण, तलाव व भूगर्भातील जलसाठयांचा नियोजनपूर्वक वापर करण्याच्या दृष्टीने शासनाने एक खास कार्यक्रम आखावा, व त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

**श्रीमती वंदना चव्हाण यांचा ठराव क्रमांक ६०, ६१, ६२, ६३**

(६०) '' वाढत्या लोकसंख्येच्या प्रमाणात शासनातर्फे व महानगरपालिकांतर्फे रुग्णवाहिका सुरु न करणे, परिणामी अपघात, नैसर्गिक आपत्ती किंवा आकस्मिक दुखणे, यामुळे सर्वसामान्य लोकांना रुग्णवाहिका सेवा तात्काळ उपलब्ध न होणे, त्यासाठी सामाजिक किंवा राजकीय संस्थांनी विभागा-विभागातून जनसेवेच्या उदात्त हेतूने रुग्णवाहिका सुरु केल्या आहेत, अशा रुग्णवाहिकांसाठी शासनातर्फे आर्थिक अनुदान देण्यात यावे, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६१) '' जीवनावश्यक वस्तुंचे कडाडलेले भाव लक्षात घेता राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानांतून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा होण्याचे दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६२) '' राज्यातील सुशिक्षित बेरोजगारांचे वाढते प्रमाण व रोजगारांअभावी त्यांच्यात निर्माण झालेले वैफल्य विचारात घेता बेरोजगारांच्या समस्या परिणामकारकपणे सोडविण्यासाठी व गरीब कुटुंबातील व्यक्तीला रोजगार मिळविण्याच्या दृष्टीने एक सक्षम व स्वतंत्र यंत्रणा स्थापन करण्यात यावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे. ''

(६३) '' राज्यात तसेच देशाच्या इतर भागात आयुर्वेदिक उपचार पध्दतीकडे वाढत असलेला कल, परदेशात सुध्दा या उपचार पध्दतीबाबत होत असलेली जागृतता, परिणामी राज्यात आयुर्वेदिक वनस्पतीच्या लागवडीची निर्माण झालेली आवश्यकता, या लागवडीमुळे आदिवासी व इतर शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीस निर्माण झालेली संधी, फलोंद्यान योजनेप्रमाणे राज्यातील आदिवासी व व इतर शेतकऱ्यांच्या शेतात रोजगार हमी योजनेतून आयुर्वेदिक वनस्पती लागवडीची योजना राबविण्यात यावी, अशी शिफारस ही विधान परिषद शासनास करीत आहे. ''

**डॉ. सुधीर तांबे यांचा ठराव क्रमांक ६५, ६६, ६७**

(६५) " राज्यातील ग्रामीण भागातील सर्व खेडी नजिकच्या महामार्गांना डांबरी रस्त्याने जोडण्यासाठी शासनाने एक कालबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरीत अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे.

(६६) " राज्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्व शासकीय कार्यालये एकाच प्रशासकीय इमारतीत असावीत,

जेणेकरुन तालुक्याच्या ठिकाणी येणा-या ग्रामीण भागातील जनतेला त्यांच्या कामासाठी वेगवेगळया कार्यालयात जाण्यासाठी पायपीट करावी लागणार नाही, तसेच आर्थिक भुर्दंड सोसावा लागणार नाही, यासाठी शासनाने योजनाबध्द कार्यक्रम आखून त्याची त्वरित अंमलबजावणी करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

(६७) "जीवनावश्यक वस्तुंचे कडाडलेले भाव लक्षात घेता, राज्यातील जनतेला शिधावाटप दुकानांतून रास्त भावाने व योग्य प्रमाणात अन्नधान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंचा नियमित पुरवठा होण्याचे दृष्टीने सध्या कार्यरत असलेली यंत्रणा अधिक कार्यक्षम करण्यासाठी शासनाने आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी शिफारस ही विधानपरिषद शासनास करीत आहे."

**तेवीस** : सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेली कागदपत्रे (यादी सोबत जोडण्यात आली आहे.)

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ८ जुलै, २०१०.

**अनंत कळसे,**
प्रधान सचिव
महाराष्ट्र विधानपरिषद.